
# ४. मङ्गलसुत्तं

**प्रस्तावना**

'मङ्गलसुत्तं' हा पद्यपाठ सुत्तपिटकाच्या खुद्दक निकायातील 'खुद्दकपाठ' या पालि ग्रंथातून घेतला आहे. खुद्दकपाठ हा ग्रंथ खुद्दकनिकायामध्ये पहिल्या क्रमांकाचा आहे. या ग्रंथाला सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे मानले जाते. 'मङ्गलसुत्तं' यामध्ये जीवन कौशल्यावर आधारित गाथा संग्रहित केलेल्या आहेत. विद्यार्थी हा देशाचा एक आदर्श नागरिक व्हावा आणि त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी हा पद्यपाठ महत्त्वाचा आहे. एकदा तथागत बुद्ध श्रावस्तीमध्ये अनाथपिण्डिकाच्या जेतवन आरामामध्ये विहार करत होते. त्या वेळी अखिल मानवाच्या सुखासाठी आपल्या आयुष्यात उत्तम मंगल काय आहे? मंगल म्हणजे काय? उत्तम मंगल कशात आहे? यावर तथागत बुद्धाने धम्मोपदेश दिलेला आहे.



बहु देवा मनुस्सा च, मङ्गलानि अचिन्तयुं ।
आकंखमाना सोत्थानं, ब्रूहि (बूहि) मङ्गलं उत्तमं ।।१।।

असेवना च बालानं, पण्डितानं च सेवना।
पूजा च पूजनेय्यानं, एतं मङ्गलं उत्तमं ।।२।।

पतिरूपदेसवासो च, पुब्बे च कतपुञ्ञुता ।
अत्तसम्मापणिधि च,  एतं मङ्गलं उत्तमं ।।३।।

बाहुसच्चं च सिप्पं च विनयो च सुसिक्खितो ।
सुभासिता च या वाचा, एतं मङ्गलं उत्तमं ।।४।।

मातापितु उपट्ठानं, पुत्तदारस्स सङ्गहो ।
अनाकुला च कम्मन्ता, एतं मङ्गलं उत्तमं ।।५।।

दानं च धम्मचरिया च, ञातकानं च सङ्गहो ।
अनवज्जानि कम्मानि, एतं मङ्गलं उत्तमं ।।६।।

आरती विरती पापा, मज्जपाना च संयमो ।
अप्पमादो च धम्मेसु, एतं मङ्गलं उत्तमं ।।७।।

गारवो च निवातो च, सन्तुट्ठि च कतञ्ञुता ।
कालेन धम्मसवनं, एतं मङ्गलं उत्तमं।।८।।

खन्ती च सोवचस्सता, समणानञ्च दस्सनं।
कालेन धम्मसाकच्छा, एतं मङ्गलं उत्तमं।।९।।

तपो च ब्रह्मचरियञ्च, अरियसच्चान दस्सनं।
निब्बानसच्छिकिरिया च, एतं मङ्गलं उत्तमं।।१०।।

फुट्ठस्स लोकधम्मेहि, चित्तं यस्स न कम्पति।
असोकं विरजं खेमं, एतं मङ्गलं उत्तमं।।११।।

एतादिसानि कत्वान, सब्बत्थंअपराजिता ।
सब्बत्थ सोत्थिं गच्छन्ति, तं तेसं मङ्गलं उत्तमं' ति।।१२।।

**(खुद्दकपाठ)**

## शब्दार्थ

बहु (वि.) – अनेक

अचिन्तयु (क्रि.) – विचार केला

सोत्थानं (स्त्री.)– सुखकारक

पण्डितं (वि.)– बुद्धिमान

एतं (सर्व.)– हेच

कतपुञ्ञता – शुभ, चांगल्या कृत्यांचा संग्रह

पुब्बे (पु.)– पूर्वी, सुरुवातीपासून

सिल्प – शिल्प, व्यवसाय

सुसिक्खितं (कृदन्त) – पूर्णपणे सुशिक्षित असणे

उपट्ठान (नपुं.) – सेवा सुश्रूषा

सङ्गह – सांभाळ, आदर सत्कार, संग्रह

ञातक (पुं.) – नातेसंबंधी

आरति(स्त्री.) – निवृत्ती

पाप (नपुं.) – वाईट कृत्य

संयम (नपुं.) – संयम

निवात (पु.) – नम्रता

कतञ्ञुता (स्त्री.) – कृतज्ञता

खन्ति – सहनशीलता

दस्सन (नपुं.) – दर्शन, भेट

धम्मसाकच्छा (स्त्री.) – धार्मिक चर्चा

बह्मचरिय (स्त्री. ) – श्रेष्ठ प्रतीचे जीवन, विशुद्धचर्या

निब्बाण (नपुं.) – निर्वाण

सच्छिकिरिया (स्त्री.) – प्रत्यक्षात आणणे, साक्षात्कार करणे

कम्पति (क्रि.) – कापणे

विरज (वि.) – निर्मळ, शुद्ध

कत्वान – करून

सोत्थि (स्त्री.) – सुख, कल्याण

मङ्गल (वि.) – उत्तम

आकंखमाना (स्त्री.)– इच्छिणारे

असेवना (स्त्री.) – संगती करू नये

सेवना (स्त्री.) – सोबत, संगती

पतिरुपदेसवासो – अनुकल प्रदेशात वास्तव्य

अत्तसम्मापणिधि – सन्मार्गात गुंतवणे

बाहुसच्च (नपुं.) – अनेक प्रकारे सत्याने वागावे

विनय (वि) – विनयशील

सुभासित – मधुर वाचा

पुत्तदारा – पुत्र व पत्नी

अनाकुल (वि.) – संदेहरहित

अनवज्ज – प्रशस्त, स्तुत्य

विरति (स्त्री.) – संपूर्ण निवृत्ती

मज्जपान (नपुं.) – मद्यपान

गारव (पु.) – गौरव

सन्तुट्ठि (स्त्री.) – संतोष, समाधान

काल (पु.) – वेळ

सोवचस्सता (स्त्री ) – विनम्रता

धम्मसवणं (नपुं.) – धम्माचे श्रवण

तप (पु.) – तपश्चर्या

अरियसच्च (नपु.) – आर्यसत्य सर्वोत्तम सत्य

फुट्ठ (कृदन्त) – स्पर्श करणे

लोकधम्म – लोकस्वभाव

असोक (वि.) – शोकरहित

खेमं (वि.) – शांती, क्षेम, सहनशीलता

न पराजिता – पराभव न पावता

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मंगल म्हणजे काय?

२) उत्तम मंगल कोणते आहे?

३) तथागत बुद्धाने मङ्गलसुत्त कोणत्या विहारात सांगितले आहे?

४) मंगलाची अपेक्षा करण्यासाठी काय करावे लागते?

५) आर्यसत्ये किती आहेत?

६) निब्बाण म्हणजे काय?

७) नम्रता असण्यासाठी कोणत्या गुणाची आवश्यकता आहे?

**२. सत्य/ असत्य लिहा.**

१) बहु देवा मनुस्साच मङ्गलानि चिन्तयुं ।

२) पमादो च धम्मेसु, एतं मङ्गलं उत्तमं ।

३) कालेन धम्मसवनं न करोति, एतं मङ्गलं उत्तमं ।

४) अकालेन धम्मसाकच्छा, एतं मङ्गलं उत्तमं।

५) दानं च धम्मचरिया च, ञातकानं च सङ्गहो ।

६) सब्बत्थ सोत्थिं गच्छन्ति, तं तेसं मङ्गलं उत्तमं ।

७) सोकं विरजं खेमं, एतं मङ्गल उत्तमं ।

**३. रिकाम्या जागा भरा.**

१) बहू देवा मनुस्सा च, ........अचिन्तयुं ।

२) माता ............ उपट्ठानं, पुत्तदारस्स सङ्गहो ।

३) कालेन .................,एतं मङ्गलं उत्तमं ।

४) तपो च ब्रह्मचरियं च,....दस्सनं।

५) आरती विरती पापा, ...........च संयमो ।

६) अत्तसम्मापणिधि च, एतं.....।

७) .........सच्छिकिरिया च, एतं मङ्गलं उत्तमं ।

**४. संधी करा.**

१) मङ्गलं + उत्तम


२) लोकधम्म + एहि

३) सब्बत्थं+ अपराजिता

४) गच्छ + अन्ति

५) धम्म + एसु

५. **जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




६. **रूपे ओळखा –**

१) कम्पति

२) कालेन

३) लोकधम्मेहि

४) फुट्ठस्स

५) कत्वान

६) गच्छन्ति

७. **विरुद्धार्थी शब्द लिहा –**

१) माता

२) पुत्तो

३) बाला

४) पापो

५) मङ्गल

☆☆☆